शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक जुलै २०२६
अंक क्र. ६७
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 52 अंक : 133 कोल्हापूर ता. 28 जुलै 2026 किंमत 2 रुपये ※ पाने 4+8 Postal Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## आवाहन

आपण आम्ही भिडे त्रैमासिक अंक, संमेलन निमंत्रणे, आजीव सभासदांकरीता सभा, सूचना अथवा भिडे प्रतिष्ठानकडून होणारा पत्रव्यवहार हे आतापर्यंत टपालाद्वारे पाठवित आहोत. परंतु प्रत्यक्षात पोस्टाने पाठविलेले टपाल मिळेल किंवा वेळेवर मिळलेच ह्याची सध्या खात्री देता येत नाही, म्हणून भिडे मंडळींना आम्हाला संमेलन निमंत्रणे, सभा सूचना किंवा इतर पत्रव्यवहार पोस्टाने न पाठविता 'पीडीएफ' द्वारे म्हणजेच डीजीटल स्वरुपामध्ये व्हॉट्सअ‍ॅप किंवा इ-मेलने पाठवाव्यात असेही काही भिडे मंडळींनी सुचविलेले आहे. तरीसुद्धा आपण त्याची अंमलबजावणी केलेली नाही. परंतु कालांतराने मनुष्यबळ, आर्थिक खर्च, वेळ ह्याचा विचार करता असा डिजिटल मध्ये बदल करणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने ज्यांना आम्ही भिडे त्रैमासिक अंक, संमेलन निमंत्रणे, आजीव सभासदांकरीता सभा सूचना अथवा भिडे प्रतिष्ठानकडून होणारा पत्रव्यवहार व्हॉट्सअ‍ॅप किंवा ई-मेलद्वारे म्हणजे डिजिटल स्वरूपांत करावा असे वाटत असेल त्यांनी आपले पूर्ण नांव, पत्त्यासहीत, मोबाईल क्रमांक देऊन खालील व्यक्तींना कळवावे, म्हणजे आगामी कार्यकारिणी सभेमध्ये ह्याबाबत विचार करता येईल. भिडे प्रतिष्ठान हे भिडे कुलाचे, भिड्यांसाठी, त्यांच्या हितासाठी असत्यामुळे आपले सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या सूचना अपेक्षित आहेत. त्या जरूर कळवाव्यात.

**१) श्री. प्रदीप भिडे, डोंबिवली ९८९२५०४०४२**
**२) श्री. प्रशांत भिडे. सातारा ९४२३०३५०२७**
**३) सौ. संपदा भिडे, दादर ८३६९०६०९७९**
**४) सौ. मेघना भिडे, पुणे ८६६८५७७१९७**


**दिलीप भिडे**, सचिव

## आजीव सभासदांसाठी

वर्ष २०२६ ते २०३१ ह्या पाच वर्षांसाठी भिडे प्रतिष्ठानची घटना कलम क्रमांक १०.१, ११.१ आणि २६.६ व २३.८ नुसार विश्वस्त कार्यकारी मंडळाच्या अकरा जागांसाठी सप्टेंबर २०२६ मध्ये निवडणूक होईल. निवडणूक तारीख, वेळ, ठिकाण निवडणूक कार्यक्रम पत्रिकाद्वारे सर्व आजीव सभासदांना सूचित करण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी. भिडे प्रतिष्ठान करिता सक्रिय काम आणि आवश्यक त्या ठिकाणी प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये योगदान देण्याची तयारी असणाऱ्या इच्छुकांनी प्रतिष्ठानशी संपर्क करावा. गेली २५ वर्षांपेक्षा अधिक अनेक भिडे मंडळींनी आपले योगदान दिले, त्यामुळेच ही संस्था भक्कमपणे उभी आहे. सर्व भिडे मंडळी आणि संस्थेचे हितचिंतक वेळोवेळी अनेक प्रकारे मदत व सहकार्य करीत आहेतच तसेच सहकार्य पुढेही मिळावे अशी विनंती करतो.

## विनम्र अभिवादन !

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष**
**दिवंगत शशिकुमार भिडे यांचे**
**१८ जुलैला प्रथम पुण्यस्मरण !**
**आजही त्यांची आठवण क्षणोक्षणी येते.**
**त्यांना भिडे प्रतिष्ठानतर्फे**
***विनम्र अभिवादन !***



स्व. शशिकुमार भिडे

# भिडे कुल संमेलन
# किहीम, अलिबाग २०२७

### दि. ९ आणि १० जानेवारी, २०२७

- स्थळ : **अमनसारा भिडे रिट्रीट**
  किहीम बीच रोड, (अलिबाग) किहीम-४०२ २०८
- वेळ : **शनिवार दि. ९ जानेवारी दुपारी ३ पासून**
  **रविवार दि. १० जानेवारी सायंकाळी ५ पर्यंत.**
- संमेलन शुल्क : **प्रतिव्यक्ती रु. ६००/-**
  (चहा, नाष्टा, भोजन व डॉर्मेटरी निवासासह)
- **शनिवार दि. ९ जानेवारी २०२७**
  उद्घाटन आणि विशेष कार्यक्रम
- **रविवार दि. १० जानेवारी २०२७**
  आम्ही भिडे ६९ व्या अंकाचे प्रकाशन, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचे सत्कार, भिडे प्रतिष्ठानचे पुरस्कार वितरण आणि सांस्कृतिक कार्यक्रम.

**सूचना :** संमेलन निमंत्रण पत्रिका नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रतिष्ठानकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यावर पोस्टाने सर्वांना स्वतंत्र पाठविल्या जातील. तसेच संमेलनसंबंधी अधिक माहिती **www.bhidekul.in** ह्या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध असेल.

**ता.क.** : संमेलनाची निमंत्रण पत्रिका पोस्टाने मिळाली नाही तरी सुद्धा भिडे कुल बंधू/भगिनी व माहेरवाशिणींना **आग्रहाचे सस्नेह निमंत्रण** !

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**


आम्ही भिडे **अंक ६७ वा**

संपादक : श्री. प्रभाकर शंकर भिडे

कार्यकारी संपादक : श्री. दिलीप वासुदेव भिडे

संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. हेमंत भिडे, जळगाव, श्री. विनायक वि. भिडे, श्री. माधव पु. भिडे, श्री. राजेंद्र भिडे, दादर

सल्लागार मंडळ : सौ. स्नेहल भिडे, ठाणे, सौ. गौरी प्र. भिडे, डोंबिवली, श्री. शंतनु नि. भिडे, सौ. मेघना भिडे, डॉ. प्रतिभा भिडे

अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर



**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए 503, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - 400028. मो. 9819951391


**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -
**TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-३०.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
**विशेष सूचना -** रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. **१) श्री. मोहन माधव भिडे, रत्नागिरी. २) सौ. अपूर्वा शंकर भिडे, भोर, पुणे. ३) श्री. मनोहर रघुनाथ भिडे, टेंबवली, देवगड. ४) डॉ. मंदार श्रीकांत भिडे, रत्नागिरी. ५) श्री. मधुसुदन धोंडू भिडे, डोंबिवली**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

| | | |
|---|---|---|
| **जुलै** | सौ. नीला आणि नंदकुमार ताम्हणकर, सांगली | ५-७-८० |

## भावपूर्ण श्रद्धांजली !




आयुर्वेदाचार्य व संस्कृत पाठशाळेचे अध्यक्ष श्री. डॉ. मंदार श्रीकांत भिडे, रत्नागिरी यांचे हृदयविकाराने निधन झाले. आयुर्वेदातील उपचार पद्धतींचा अभ्यासपूर्ण अवलंब करून उपचार करणारे ते प्रसिद्ध डॉक्टर होते. मुंबई मध्ये रेल्वेमध्ये चढताना गर्दीमध्ये प्लॅटफॉर्मवर पडून त्यांना गंभीर दुखापत झालेली होती. त्यांच्यावर सायन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. परंतु शेवटी नियतीने आपला डाव साधला. डॉ. मंदार यांचे शिक्षण रत्नागिरी, अहमदाबाद येथे झाले. औषधापेक्षा सुद्धा जीवनशैली आणि आहार यांचा योग्य अवलंब केला तर गंभीर विकार सुद्धा पूर्ण बरे होऊ शकतात असे त्यांचे सांगणे होते. रुग्णांशी बोलून, त्यांच्या सवयी जाणून घेऊन, तपासून रुग्णांच्या प्रकृतीचे निदान करून आहारातील योग्य ते बदल आवश्यकतेनुसार करून रुग्णांना बरे करण्यावर त्यांचा भर होता. निरपेक्ष वृत्ती आणि विनम्रता हे गुण त्यांच्याकडे होते. रत्नागिरी येथील रामदेव संस्कृत पाठशाळेचे ते अध्यक्ष होते. वैदिक हिंदू धर्मावर निष्ठा आणि अनेक धार्मिक कार्यक्रमात सुद्धा मोलाचा सहभाग होता. आयुर्वेद व्यासपीठ ह्या संस्थेमध्येही त्यांचे कार्य मोठे होते. वैद्यकीय व्यवसायामध्ये आहार, पथ्यपाणी या त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक रुग्ण बरे झाले आहेत. याची प्रचिती अनेकांना होती. दिवंगत वैद्यचुडामणी रघुवीर भिडे हे डॉ. मंदार यांचे काका होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. भिडे प्रतिष्ठान आणि सर्व भिडे परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहोत. डॉ. मंदार यांना चिरशांती लाभो. भिडे प्रतिष्ठान आणि आम्ही भिडे परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**मुखपत्रातील माहितीचा वापर लेखकाच्या परवानगीशिवाय करू नये. लेखातील विचार वैयक्तिक आहेत. लेखात आढळणाऱ्या उणिवा, चुका यासंबंधी कोणत्याही प्रकारची कायदेशीर जबाबदारी संपादकांवर असणार नाही.**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

# पुस्तक प्रकाशन



श्री. रवींद्र प्रभाकर भिडे म्हणजे सांगली येथील यंत्र लोह वस्तू उद्योगातील कारखानदार भिडे परिवारापैकी आहेत. वास्तविक ही व्यक्ती लेखक नाही. परंतु त्यांच्या ६० ते ६५ वर्षांतील अनेक आठवणी असल्यामुळे आपण सुद्धा पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न करावा ह्या हेतूने त्यांच्या ‘शिदोरी’ या पुस्तकाचे प्रकाशन १७ मार्च, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे मंत्री श्री. गिरीशजी महाजन यांच्या हस्ते झाले. वयाच्या १० व्या वर्षापासून ७४ वर्षांपर्यंत अनुभवलेल्या घटना, प्रसंग तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करताना भेटलेल्या अनेक राजकीय व्यक्ती म्हणजे स्व-अटलजी, मधु दंडवते, श्री. गडकरी, संघ प्रचारक श्री. मुकुंदराव गोरे, राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर, मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस तसेच रोटरी क्लब सांगली, अभिनेते संजय दत्त, प्रभाकर पणशीकर आणि आंतर महाविद्यालयीन गायन स्पर्धेमध्ये स्व. बाबुजी फडके यांचेकडून पारितोषिक घेताना अशा अनेक दिग्गज व्यक्तींशी आलेले संबंध तसेच व्यवसायातील आलेले अनुभव, संघामध्ये कार्य व आलेले अनुभव ह्याचे लेखन शिदोरी पुस्तकामध्ये वाचायला मिळते. पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये म्हणतात की मला कधी वाटलंच नव्हतं की मी एखादे पुस्तक लिहीन, परंतु मनामध्ये प्रतिभा आणि डोक्यामध्ये साहित्य असले म्हणजे लिखाण होऊ शकते. २००३ आणि २०१८ च्या भिडे संमेलनामध्ये त्यांचा सांगली येथे सक्रिय सहभाग होता. अजूनही त्यांना कोणतेही काम सांगितले तरी ‘नाही’ हा शब्द त्यांच्या कोशात नसतो. आपण सर्व सभासदांनी हे पुस्तक जरुर वाचावे. ज्यांना वाचनासाठी ‘शिदोरी’ हे पुस्तक हवे असेल त्यांनी प्रतिष्ठानशी संपर्क करावा. श्री. रवींद्र ह्यांना भिडे प्रतिष्ठान व समस्त भिडे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा !

# हार्दिक अभिनंदन !



भिडे प्रतिष्ठानच्या विश्वस्त आणि गेली १० वर्षे मोलाचे योगदान देणाऱ्या सौ. संपदा भिडे, यांची ब्राह्मण सेवा मंडळ, दादर ह्या संस्थेमध्ये कार्यकारी सदस्य (स्त्रियांसाठी) म्हणून तीन वर्षांकरिता बिनविरोध निवड झाली. भिडे प्रतिष्ठान आणि समस्त भिडे परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

*****

वल्लरी प्रकाशनतर्फे गुलबक्षी ह्या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन पुण्यात झाले. ह्या गुलबक्षी काव्य संग्रहामध्ये एकूण अकरा कवींच्या कवितांचा समावेश आहे. त्यामध्ये डॉ. चैताली भिडे, नेरळ, मुंबई यांना प्रतिभावान कवयित्री सन्मान प्राप्त झाला. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन ! डॉ. चैताली निसर्गोपचार व योगशास्त्र क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ व मार्गदर्शक आहेत. केवळ वैद्यकीय क्षेत्रापुरते त्यांचे कार्य मर्यादित नसून समाज प्रबोधन, सर्जनशील जीवनदृष्टी असे प्रेरणादायी विचार त्यांनी अनेक कविता करून जीवनानुभव मांडले आहेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्य करून साहित्यामध्ये सुद्धा आपल्या प्रतिभेचा ठसा उमटविणारे दुर्मिळ असतात. डॉ. चैताली यांच्या कार्याचा विस्तार विशाल आहे. त्याची माहिती आपण ‘आम्ही भिडे’ अंकात यथावकाश देणार आहोत. त्यांना पुढील वाटचालीकरिता पुन्हा एकदा शुभेच्छा !



*****



वैद्यकीय, सामाजिक आणि राजकीय अशा विविध क्षेत्रांमध्ये अविरत कार्यमग्न राहून मोलाचे मार्गदर्शन देणारे, भिडे प्रतिष्ठान आणि समस्त भिडे परिवाराकरिता सदासर्वकाळ मदतीला धावून येणारे आधारवड श्रीक्षेत्र गणपतीपुळे येथील डॉ. विवेक यशवंत भिडे, मालगुंड यांना श्रीराम नवमीच्या पवित्र दिनी ‘समर्थ रत्न सन्मान पुरस्कार २०२६’ रत्नागिरी येथे प्राप्त झाला. ही भिडे कुलासाठी अभिमानाची बाब आहे. डॉ. विवेक भिडे यांचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा !

*****

‘प्राचीन भारतीय खगोल विज्ञान’ ह्या मराठी पुस्तकाचे प्रकाशन डिसेंबर, २०२५ मध्ये झाले. त्याच पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर आणि संपादनाचे काम श्री. अक्षय भिडे, अलिबाग यांनी केले. एप्रिल, २०२६ मध्ये ह्याच मराठी पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर प्रकाशित झाले. काही कारणांमुळे त्यांना ह्या समारंभाला उपस्थित राहता आले नाही. श्री. अक्षय भिडे यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे हे पुस्तक इंग्रजी भाषेत अनुवादित होऊन प्रकाशित झाले. ह्याकरिता भिडे प्रतिष्ठानकडून श्री. अक्षय यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !



*****

# भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जुलै

१. श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव १
२. सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे १
३. श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी २
४. श्री. सुधीर विष्णू भिडे, बदलापूर २
५. कु. वैदेही अनिल भिडे, पुणे ३
६. श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे ५
७. कु, शर्वरी योगेश भिडे, मिरज ५
८. कु. चैताली संजय भिडे, सांगली ६
९. श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण ७
१०. श्री. जयराम महादेव भिडे, सोलापूर ७
११. कु. पावनी शार्दुल भिडे, पुणे ७
१२. श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे ८
१३. श्री. पराग रघुवीर भिडे, बेंगलोर ९
१४. श्री अरुण महादेव भिडे, नाशिक ११
१५. श्री. संदीप प्रमोद भिडे, पुणे ११
१६. श्री. आदित्य प्रभाकर भिडे, रायबंदर ११
१७. चि. अर्जुन विक्रम भिडे, पुणे १३
१८. कु. शोभना विष्णू भिडे, पुणे १३
१९. सौ. वीणा रवींद्र नाईक (भिडे), पुणे १३
२०. श्री. वि. कृ. भिडे, नाशिक १४
२१. श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली १५
२२. सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई १५
२३. सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई १६
२४. श्री. अनिल वामन भिडे, पुणे १७
२५. सौ. विनया विद्याधर जोशी, संगमेश्वर १७
२६. तन्वी नितीन भिडे, पुणे १७
२७. श्री. संजय दिगंबर भिडे, पुणे १९
२८. श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल २०
२९. सौ. मेघना आशिष भिडे, पुणे २०
३०. श्री. प्रसन्नकुमार मोरेश्वर भिडे, पुणे २१
३१. सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा २२
३२. श्री. प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली २२
३३. कु. आयन आशुतोष भिडे, भांडुप २२
३४. कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे २३
३५. श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, पुणे २३
३६. श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे २३
३७. श्री. मंदार आनंद भिडे, संगमेश्वर २३
३८. सौ. शर्वरी राजीव भिडे, ठाणे २३
३९. श्री. विनय विष्णू भिडे, पुणे २४
४०. श्री. सुबोध बाळकृष्ण भिडे, पनवेल २४
४१. चि. कपिल गणेश भिडे, पुणे २५
४२. सौ. समिधा स्वप्निल खरे, पुणे २५
४३. सौ. अपर्णा अजय भिडे, भोर २६
४४. सौ. स्मिता सतिश भिडे, मुंबई २७
४५. सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे २७
४६. सौ. प्रांजली मनोज भोर, पुणे २७
४७. श्री. विकास वसंत भिडे, सांगली २७
४८. श्री. सुमंत यशवंत भिडे, गुहागर २७
४९. सौ. मीना सुभाष पुरोहित, कोल्हापूर २७
५०. श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे २८
५१. श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली २८
५२. श्री. श्रेयस श्रीकृष्ण भिडे, मालाड ३०
५३. सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज ३०
५४. सौ. आरती विक्रांत भिडे, पुणे ३०
५५. श्री. केतन विश्वनाथ भिडे, पुणे ३०
५६. श्री. चेतन विश्वनाथ भिडे, पुणे ३०
५७. आरती शंकर भिडे, पुणे ३०

## ऑगस्ट

१. कु. त्रिशा अभिजित भिडे, भोर १
२. सौ. रमा रमेश भिडे, मुंबई १
३. श्री. शिरीष सुरेश भिडे, पुणे २
४. श्री. प्रणव हेमंत भिडे, मुरबाड २
५. श्रीमती प्रतिभा प्रभाकर भिडे, पुणे ३
६. सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ ३
७. श्री. अनिरुद्ध विश्वास भिडे, पनवेल ३
८. चि. वरदा ओंकार जोशी, पुणे ४
९. कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा ६
१०. श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे ६
११. श्री. चिन्मय विजय भिडे, नागपूर ६
१२. सौ. योगिनी माधव भिडे, पुणे ७
१३. सौ. स्नेहल सुनिल भिडे, पुणे ७
१४. श्री. आदित्य मनोहर भिडे, हैद्राबाद ९
१५. चिं. ओंकार मिलिंद भिडे, पुणे १०
१६. सौ. माधवी वैभव जोगळेकर, बांद्रा १०
१७. सौ. आरती आलोक भिडे, सिंगापूर १०
१८. सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई ११
१९. श्री. अमित दिलीप भिडे, पुणे १२
२०. श्री. मदन वासुदेव भिडे, मुलुंड १२
२१. श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर १३
२२. श्री. निळकंठ भिडे, नाशिक १३
२३. श्री. रोहित सुनिल भिडे, मिरज १३
२४. श्रीमती प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे १४
२५. सौ. रश्मी भास्कर भिडे, कात्रज १४
२६. सौ. अंजली माधव भिडे, रायबंदर १४
२७. श्रीमती विजया प्रल्हाद भिडे, विजापूर १४
२८. सौ. ऋता कौस्तुभ जोशी ठाणे १५
२९. ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे १५
३०. श्री. आशिष गोविंद भिडे, कल्याण १५
३१. कु. अमृता रमेश भिडे, पुणे १५
३२. श्री. प्रशांत सदानंद भिडे, सातारा १६
३३. सौ. पल्लवी गिरीश भिडे, पंढरपूर १६
३४. सौ. शुभांगी सुबोध भिडे, पनवेल १७
३५. सौ. मानसी दिनेश भिडे, डोंबिवली १७
३६. श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे १८
३७. श्री. अमित सुभाष भिडे, मालाड १८
३८. सौ. अनघा किरण सातर्डेकर, पुणे १८
३९. श्री. तेजस सुनिल भिडे, मिरज १८
४०. डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ १९
४१. कु. देविका अविनाश भिडे, नाशिक १९
४२. कु. मृणाल अविनाश भिडे, नाशिक १९
४३. श्री. प्रणव प्रसाद भिडे, पुणे २०
४४. कु. मधुरा मिलींद भिडे, बडनेरा २०
४५. ॲड. वृंदा योगेशचंद्र भिडे, पुणे २०
४६. सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली २१
४७. श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे २१
४८. सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे २१
४९. कु. श्रीयांश सचिन भिडे, पुणे २१
५०. श्री. प्रतिक चंद्रकांत भिडे, ठाणे २१
५१. सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे २२
५२. श्री. अनय शुभानन भिडे, २२
५३. डॉ. प्रमोद रामकृष्ण भिडे, डिचोली २२
५४. श्री. नरेंद्र जनार्दन भिडे, सुरत २२
५५. सौ. गौरी प्रदीप भिडे, डोंबिवली २३
५६. सौ. अलका चित्तरंजन पटवर्धन, पुणे २४
५७. श्री. सुरेश शंकर भिडे, मुंबई २४
५८. सौ. शैलजा केशव भिडे, पुणे २५
५९. सौ. मानसी मिलींद भिडे, मिरज २५
६०. श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल २६
६१. श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली २६
६२. श्री. सुकृत सुभाष भिडे, बाणेर २६
६३. श्री. नवीन वसंत भिडे, इंदौर २६
६४. सौ. माधुरी प्रमोद भिडे, डोंबिवली २६
६५. श्री. श्रीकांत मधुकर भिडे, माहीम २७
६६. श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली २७
६७. सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ २८
६८. श्री. अमित पद्माकर भिडे, पनवेल २८

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

६९. सौ. स्मिता अरविंद घैसास, ठाणे २८
७०. सौ. शर्वरी अनिरुद्ध भिडे, पनवेल २८
७३. सौ. वर्षा योगेश भिडे, मिरज २९
७२. सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे ३०
७३. श्री. संजय माधव भिडे, रायबंदर ३०
७४. श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम ३१
७५. श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर ३१
७६. अश्विनी लोटलीकर (भिडे), मुंबई ३१

**सप्टेंबर**

१. कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली १
२. श्री. रघुवीर गोपाळ भिडे, हुबळी १
३. श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली २
४. श्री. अनंत हरी भिडे, मालाड २
५. श्रीमती लता दिलीप भिडे, सूरत २
६. श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे ३
७. सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण ३
८. कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव ४
९. सौ. माधवी सारंग भिडे, सांगली ४
१०. सौ. वीणा सुनिल केळकर, पुणे ५
११. कु. आर्या चारुदत्त भिडे, माभळे ६
१२. श्री. देवेंद्र रविंद्र भिडे, कल्याण ६
१३. श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे ७
१४. श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण ७
१५. श्री. सुरेंद्र विनायक भिडे, पुणे ७
१६. श्री. अनंत पद्माकर भिडे, अलिबाग ७
१७. श्रीमती वनिता मोहन भिडे, डोंबिवली ७
१८. मनश्री मंदार भिडे, चिपळूण ८
१९. श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे ८
२०. सौ. मनाली मंदार भिडे, माभळे ८
२१. सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर ९
२२. कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे १०
२३. सौ. अनघा अमित पटवर्धन, बदलापूर १०
२४. सौ. रिद्धी सौरभ भिडे, रायबंदर १०
२५. श्री. राहुल विजय भिडे, दादर १०
२६. श्री. अनंत विनायक भिडे, नागपूर ११
२७. श्री. रवींद्र विजय भिडे, विलेपार्ले १२
२८. श्री. आयुष आशिष भिडे, मुंबई १२
२९. श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा १३
३०. सौ. मानसी चारुदत्त भिडे, माभळे १४
३१. सौ. हर्षदा व्ही. भिडे, रायगड १५
३२. श्री. आनंद भिडे, मुंबई १६
३३. सौ. लता नारायण भिडे, जबलपूर १६
३४. श्री. मोहन अनंत भिडे, डोंबिवली १६
३५. श्री. पर्णाद श्रीकृष्ण भिडे, पुणे १६
३६. सौ. मृण्मयी श्रीपाद भिडे, तळेगाव दा. १६
३७. श्री. विजय अनंत भिडे, ठाणे १७
३८. श्री. कृष्णाजी परशुराम भिडे, बदलापूर १७
३९. श्री. मानंद मिलींद भिडे, मुंबई १७
४०. सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे १८
४१. कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली १८
४२. श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे १८
४३. श्री. सदानंद पुरुषोत्तम भिडे, पुणे १९
४४. कु. रचना नितीन भिडे, डोंबिवली १९
४५. श्री. धनंजय नारायण भिडे, नागपूर १९
४६. श्री. सतीश दत्तात्रय भिडे, पुणे २०
४७. श्री. विनय विष्णू भिडे २०
४८. कु. बिल्वा अमित भिडे, पुणे २१
४९. सौ. तेजश्री शौनक नातू, माभळे २१
५०. श्री. योगेश प्रभाकर भिडे, ऑस्ट्रेलिया २१
५१. सौ. रेणुका केदार भिडे, पुणे २२
५२. कु. गौरी विनोद भिडे, औरंगाबाद २२
५३. चि. जयराज विनोद भिडे, औरंगाबाद २२
५४. कु. मनस्वी दिनेश भिडे, डोंबिवली २३
५५. कु. वैभवी अशोक भिडे, डोंबिवली २३
५६. श्री. श्रीधर विनायक भिडे, बोरिवली २३
५७. सौ. वासंती रमेश भिडे, पुणे २४
५८. कु. मृदुला दिनेश भिडे, डोंबिवली २४
५९. श्री. योगेश यज्ञेश्वर भिडे, पुणे २४
६०. सौ. मनाली गौरव भिडे, पुणे २४
६१. श्री. रमेश कृष्णाजी भिडे, मुंबई २४
६२. सौ. स्मिता चंद्रकांत भिडे, ठाणे २४
६३. श्री. अनंत श्रीधर भिडे, मिरज २४
६४. श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद २५
६५. सौ. कीर्ती मंदार भिडे, बोरिवली २५
६६. कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई २६
६७. कु. सारंग संतोष भिडे, ठाणे २६
६८. श्री. रमेश विठ्ठल भिडे, पुणे २६
६९. डॉ. प्रकाश विष्णू भिडे, पुणे २६
७०. श्री. चैतन्य आनंद भिडे नाशिक २६
७१. श्री. रोहित विजय भिडे, ठाणे २७
७२. श्री. श्रीकांत वसंत भिडे, पुणे २७
७३. श्री. हेरंब प्रसाद भिडे, माभळे २८
७४. श्री. चंद्रशेखर लक्ष्मण भिडे, अंबरनाथ २८
७५. सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा २९
७६. श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे २९
७७. श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण २९
७८. सौ. मानसी विक्रम भिडे, पुणे ३०
७९. नीता प्रसाद भिडे, डोंबिवली ३०
८०. सौ. नीता प्रसाद भिडे, डोंबिवली ३०

## निर्लेप व्यक्ती !



माझा भाऊ स्व. मनोहर रघुनाथ भिडे, रा. टेंबवली, देवगड यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. काही वर्षे मुंबई येथे नोकरी व्यवसाय केला. प्रिमिअर कंपनीमध्ये नोकर कपातीमुळे १९६० मध्ये टेंबवली येथे येऊन शेती करू लागले. घरात आई–वडील, लहान भावंडे, परिस्थिती बेताचीच होती. दरम्यान विवाह झाला. पत्नी मालती यांनी उत्तम साथ दिली. गावात भिक्षुकी करुन अनेक कुटुंबांशी त्यांनी आपुलकीचे नाते जोडले. ह्या जीवनप्रवाहात त्यांची भावंडे, मुली, जावई यांनी त्यांना उत्तम साथ दिली. कधी अनवाणी तर कधी उपाशीपोटी सुद्धा दिवस काढले. अशाही परिस्थितीत त्यांनी अभिनय, गावामध्ये नाटके बसविणे व त्याचे प्रयोग करणे हे छंद जोपासले. त्याचबरोबर गरजूंना मदत, प्रसंगी स्वतःच्या घासातील घाससुद्धा देऊ करायचे. २०१५ साली त्यांची पत्नी सौ. मालती यांचे निधन झाले. परिस्थिती कोणाच्या हातात नसते. निर्लेप आणि निर्व्यसनीपणा मात्र अखेरपर्यंत माझ्या सख्ख्या भावाने राखला हे मी अभिमानाने सांगते. सरतेशेवटी पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ! ईश्वरी सत्तेपुढे इलाज नाही. त्याला भावपूर्ण श्रद्धांजली !

**रोहिणी सोमण (भिडे), पुणे.**

# आठवणी कॅप्टन भिडे वाडा, सातारा

– दीनानाथ पांडुरंग भिडे,
मुलुंड, मुंबई

मित्रांबरोबर गप्पा मारत असताना थंड हवेच्या ठिकाणाचा विषय निघाला आणि मला साताऱ्याची आठवण आली. ५० वर्षांपूर्वी हवा वर्षभर छान असायची. महाबळेश्वर ३० मैलांवर आणि १० मैलांवरील कासपठार फुलांकरिता प्रसिद्ध आहे. तेथे आमचा मोठा वाडा होता. पण वाळवीने पोखरला आणि भूकंपाने भिंतीला तडे गेल्यामुळे शेवटी मनावर दगड ठेवून तो पाडून बिल्डिंग बांधावी लागली. जवळजवळ ७००० चौरस फूट बांधीव इमारत व ३००० चौरस फूट मोकळी जागा होती. यात विहीर, श्रीदत्त मंदिर व बाग होती. फणस, बकुळी, केळी, नारळ, आवळा, गुलाब, तगरी, जाई, जास्वंदी, बेल, पेरू इत्यादी खूप झाडे होती. मे महिन्यामध्ये विहिरीचे पाणी काढून अंघोळ करायला मजा यायची. तेथे दगडी कुंडी होती. त्यात पाणी साठवायचे. त्याच्या बाजूला अळू, कर्दळी, संकेश्वर, निलगिरी, बाभूळ, चिंच, खोबरी आंबा, आवळा, जांभूळ, पांढरा चाफा, गुंजेचा वेल होता. बागेच्या मध्यभागी नळ, दगडी कुंडी आणि हौद होता. घोसाळ्याचा वेल होता. कुंपणाला पांगारीची झाडे लावली होती. बागेत खूप कामे असायची. वडील सैन्याच्या शिस्तीमधले असल्यामुळे आळे बरोबर गोलाकार असायची. त्याला विटांचे तुकडे लावायचे. उन्हाळ्यात सतरंजी टाकून मस्त दुपारी झोपायचे. लिंबाचे सरबत प्यायचे. पेरू खायचे, कधी कधी वानरे यायची. मग डबे वाजवायचे, फटाके वाजवायचे.

ढीगावरचा आंबा कमीत कमी १००० आंबे निघायचे. पाड लागला की झेळणी घेऊन झाडावर चढायचे आणि एका पिशवीमध्ये काढून दोरीने खाली सोडायचे. हरणी, दुली आणि कपिली अशा गाई होत्या आणि भोरी म्हैस होती. वीण झाली की खरवस खूप करायचा. रोज दही भरपूर असायचे. सणावारी घरी श्रीखंड करायचे. वडिलांचा ज्योतिषाचा दांडगा अभ्यास होता. रोज खूप माणसे भविष्य विचारायला यायची. गवताचे भारे रोज यायचे. (पाचुंदा) मोजून हिशेब ठेवायचा. यवतेश्वर डोंगरावरून बायका यायच्या. दर गुरुवारी आणि रविवारी लोणी विकायला बायका यायच्या. आई त्यांना चहा, जेवायला भाकरी, आमटी, लोणचे द्यायची. गोठ्याला ९ एप्रिल १९६६ रोजी आग लागली. त्यामध्ये म्हैस गेली. नंतर वडिलांनी कुठलीच जनावरे पाळायची नाहीत असे ठरविले.

श्रीदत्ताचे मंदिर होते. दत्त जयंतीच्या आधी पंधरा दिवस छत व झालर लावायचे. वडील गुरुचरित्राचे पारायण करायचे. उत्सवाच्या दिवशी बसायला सतरंजी व गालिचे घालायचे. खूप मंडळी यायची. आमचे गुरुजी आप्पा भिडे खूप फुलांची आरास करायचे. शंकराचार्य मठातून जोशी गुरुजी व चार जण देवे म्हणायला यायचे. लाइटिंग करायचे. त्यावेळी खूप थंडी असायची. हॅण्डलवाला ग्रामोफोन होता. त्यावर ७८ स्पीडच्या रेकॉर्ड लावायचो. जुने अनमोल घडी, वारीस, ज्युवेल थिफ गाणी लावत असू. डॉ. पंढरी नेहमी अनमोल घडीची गाणी लावायला सांगत असे. श्रावणी सोमवारी शाळेला अर्धा दिवस सुट्टी असे. मग सर्व मित्रमंडळी यवतेश्वरच्या दर्शनाला महादरेमार्गे पायऱ्यांवरून जात असू. जाताना महादरेला जनाबाई निपाणे यांच्या घरी गुळाचा चहा पिऊन जात असू. चांदणी भोजन, आवळी भोजनासाठी समोरची फाटक मंडळी सर्व यायची. एकत्र भोजन करत असू. मे महिन्यामध्ये ९ ते १२ वाजेपर्यंत पत्ते खेळत असू. दसऱ्यानंतर भैरोबाला दहीभाताचा नैवेद्य फाटक मंडळी करत असत. आम्ही सर्व तिकडे जात असू. मंदिरामागे मोठे वडाचे झाड होते. त्याला सूरपारंब्या खेळत असू. आई पहाटे ४ वाजता उठून कामाला लागत असे. थोरला भाऊ, बहीण गावावरून आले की जाताना चिवडा व लाडू करून द्यायचे. त्यावेळी बाजारात तयार फराळ मिळत नसे. रोज संध्याकाळी राजवाडा ते आनंदवाडीच्या दत्त मंदिरापर्यंत सर्व मित्र मंडळी फिरत असू. कधी कधी २५-३० जण बरोबर असत. मग आराम हॉटेलला चहा किंवा संतोष हॉटेलला पुरी-भाजी किंवा पॅटीस खाऊन परत येत असू. कल्पना हॉटेलला गाणी ऐकत व भजी खात बसत असू. कॉलेजवरून येताना बी ॲण्ड सीची पुरी-भाजी ५५ पैशात मिळत असे. आई-वडील गेल्यानंतर मित्रांच्या सोबतीमुळे कधी एकटे वाटले नाही. थोरली बहीण अक्का व भाचे मंडळी दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत येत असत. मग आम्ही खूप खेळायचो. हत्तीखाना प्राथमिक शाळा व न्यू इंग्लिश स्कूलला शालेय शिक्षण व लाल बहादूर शास्त्री आणि धनंजयराव गाडगीळ कॉलेजला शिक्षण झाले. त्यावेळी सायकलचाच उपयोग होत असे.

**निवेदन – भिडे कुलवृत्तांताची दुसरी आवृत्ती मूल्य रु. ५०० उपलब्ध आहे. खालील ठिकाणी संपर्क करावा.**

**१. ले. क. सुनिल भिडे, पुणे ९६२३०१७४४४**

**२. दिलीप भिडे, पुणे ९६५७५४१२३६**

**३. माधव भिडे, पुणे ९७६३७२७६८८**

**भिडे कुलातील विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या घवघवीत यशासाठी हार्दिक अभिनंदन !**

कु. तन्वी पर्णाद भिडे पुणे
इ.१०वी शालांत परीक्षेमध्ये
एकूण ५०० पैकी ४८४ गुण, ९६.८०%



चि. अथर्व अमोल भिडे, पुणे
इ.१० वी (सीबीएसई) परीक्षेमध्ये
एकूण ५०० पैकी ४९० गुण ९८%



कु. पर्णिका अनिल भिडे, पुणे
इ. १० वी शालांत परीक्षेमध्ये
एकूण गुण ५०० पैकी ४९९ गुण ९९.८०%



चि. ईशान अमित भिडे, पुणे याला इ.५ वी मध्ये सन २०२५-२६ या वर्षाकरिता एक्सलन्स ॲकॅडेमिक ॲवॉर्ड मिळाले. ईशान न्यू इंडिया स्कूल, कोथरूड येथे शिकत आहे. गेल्या वर्षी सुद्धा त्याला एक्सलन्स ॲकॅडेमिक ॲवॉर्ड मिळाले होते. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे त्याचे हार्दिक अभिनंदन !



# योग साधना

**डॉ. चैताली श्रीकृष्ण भिडे**
**नेरळ, मुंबई**

योग साधना योग म्हणजे तन-मन-धन या सर्व तत्त्वांचे एकत्रीकरण योग साधून जी व्यक्ती ईश्वरमय होते त्यांना आपण योगी म्हणू शकतो. भिडे कुटुंबीयांचे कुलदेवीचे नाव श्री योगेश्वरी आहे. ध्यान धारणा आणि समाधी हे तुम्हाला मनाच्या अंतरंगात घेऊन जातात तर यम, नियम, आसन प्राणायाम आणि प्रत्याहार ही योगाची बाह्यांग आहेत. तुम्ही एका जागी मन स्थिर करून शांतपणे एकाग्र चित्ताने एके ठिकाणी मन स्थित करून नको त्या विचारांना थारा न देता, मनात कोणत्याही वाईट विचारांची गर्दी न करता, त्यांना बाहेर फेकून देऊन, फक्त सुविचारांना जागा निर्माण करून, फक्त सुविचारांना जागा निर्माण झाली तर त्यांची स्पंदने खोलवर दृश्य परिणाम दाखवितात. तुमच्या सकारात्मक विचारांची शक्ती अयोग्य, असुरक्षित कडे नाहीसे करून योग्य विचार, अनुशासन आणि शरीराच्या मनाच्या चांगल्या सवयी जोपासून ईश्वरांशी रममाण होऊन तुमच्या हातून सद्वर्तन, सहकार्य, सत्कार्य आणि सद्भावना निर्माण होते. साधक हा साधने शिवाय योग्य योगिक शक्ती शिवाय मनोधारणा तयार करूच शकत नाही. म्हणून योग साधनेचे महत्त्व पूर्वपार चालत आले आहे. ही सर्वांनी भारतीय संस्कृती जपणारी आणि नवीन विचारांना संशोधनावर योग्य प्रक्रिया करून नवनवीन विचारांनी आधुनिक व व्यावसायिक मार्गदर्शन पूर्वापार चालत आले आहे. ही सर्वांनी भारतीय संस्कृती जपणारी आणि संशोधनावर योग्य प्रक्रिया करून नवीन विचारांनी आधुनिक व्यावसायिक मार्गदर्शन करणारी अद्भुत कला संस्कृती जपणारी भारतीय निष्ठा ठेवून काल्पनिक नसलेली शास्त्रीय उपचार पद्धती आहे.

योगसाधनाने स्वप्न चक्रांवर ध्यान धारणेवर भर दिला आहे. मूलाधार चक्र पासून ते सहस्रार चक्रापर्यंत सर्व चक्र उद्दिपीत **(ACTIVATE)** करून त्यांना सक्रिय करता येते. ही सप्तचक्रे पुढीलप्रमाणे आहेत. १) मूलाधार चक्र : **Root Chakra** २) स्वाधिष्ठान चक्र : **Sacral Chakra** ३) मणिपूर चक्र : **Solar Plexus** ४) अनाहत चक्र : **Heart Chakra** ५) विशुद्धी चक्र : **Throat Chakra** ६) आज्ञाचक्र : **Third Eye Chakra** ७) सहस्रार चक्र : **Crown Chakra**

विज्ञानाप्रमाणे डोक्यापासून पायापर्यंत एक एक रचनेचा विचार केला आहे.
१) श्वसन संस्था [Respiratory System] २) पचन संस्था [Diagestive System] ३) रक्ताभिसरण संस्था [Circulatory System]
४) उत्सर्जन संस्था [Excretory System] ५) प्रजनन संस्था [Reproductive System] ६) मज्जा संस्था [Nervous System]
७) कान, नाक, घसा [Otolaryangolago (Ear-Nose Throat]

**योगशास्त्रानुसार योगाचे प्रकार –** १) ज्ञानयोग – आत्मज्ञानाचा मार्ग, २) भक्तियोग ईश्वराची भक्ती आणि भजन, ३) कर्मयोग – फळाची अपेक्षा न धरता निःस्वार्थपणे कर्म करणे, ४) राजयोग – मनाच्या वृत्तीवर नियंत्रण ठेवणे, ५) हठयोग – शरीराची शुद्धी आसन आणि कुंडलिनी जागृती.

**योगसाधनेचे फायदे –** १) तणाव आणि चिंता कमी होते. २) शरीराची लवचिकता वाढून स्नायू बळकट होतात. ३) पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. ४) मन शांत आणि एकाग्र होते. ५) वाईट विचार नकारात्मकता नाहीशी होते. योग्य आचरण आणि शरीर धर्माचे योग्य पोषण होते. योगसाधना केवळ शारीरिक नसून शरीर, मन आणि आत्मा यांना जोडणारी एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे. हे शारीरिक स्वास्थ्य आणि मनःशांती मिळवण्यासाठी नियमितपणे केल्या जाणाऱ्या अभ्यासाचे. साधनेचे एक स्वरूप आहे.
योगचित्त योगेश्वर। योगानंद योगी भव ।

# मेजवानी

**- अनघा भिडे, पुणे**

गेल्या आठवड्यात काही कामानिमित्त कोकणात गावी जाणं झालं. या वेळी खास मैत्रीण आणि तिची ८० वर्षांची आई आणि ८३ वर्षांचे बाबा यांना कोकण दाखवायला न्यायचं होतं. त्यांना फिरवणं आणि घरची काही कामं उरकणं हा मुख्य अजेंडा होता. पण या वेळची कोकण ट्रीप विशेष लक्षात राहिली ती दोन कारणांमुळे. बऱ्याच वर्षांनी मी शिमग्याच्या आसपास गावी गेले होते. होलिकादहनानंतर म्हणजेच शिमग्याला गावोगावी देवाचं निशाण येतं, खेळे खेळणारे, निशाण नाचवणारे मानकरी येतात. गावच्या प्रत्येक वाडीतून, आळीतून हे निशाण फिरतं. निशाण आलं की त्याची, पालखीची घरच्या यजमानांकडून पूजा केली जाते. बायका खणा-नारळाने ओट्या भरतात. नारळ, तांदूळ आणि दक्षिणा ठेवून तळी भरली जाते आणि मानकरी घरच्यांसाठी गाऱ्हाणं घालतात. तो सगळा शिधा आणि नारळ ही त्या मानकऱ्यांची कमाई असते. ढोल वाजवून, टाळ, झांजा वाजवत निशाण फडकवलं जातं, पोशाख घालून, फेर धरून खेळे खेळले जातात. त्या निमित्ताने गावकरी मंडळी एकत्र येतात, प्रसादाची देवाण-घेवाण होते, मानकऱ्यांची सेवा केली जाते आणि या सगळ्यामागे 'सगळ्यांचं भलं कर रे महाराजा' ही एकच प्रार्थना असते. हा एक हटके अनुभव प्रथमच घेतला.

दुसरं कारण म्हणजे - गेल्या शुक्रवारी संकष्टी होती त्या निमित्ताने देवगडच्या उत्तरा जोशी हिच्या अथर्व प्युअर व्हेजला भेट द्यायची संधी मिळाली. आदल्या दिवशी उत्तराला फोन करून वेळ कळवून ठेवली होती. तिने लगेचच नक्की या, जागा मिळेल असं सांगून आश्वस्त केलं. मैत्रिणीच्या आई-बाबांना मालवण, तारकर्ली फिरवून तिच्याकडे पोहोचायला ९ वाजून गेले होते. दिवसभर उपवास आणि भटकंती यामुळे भुकेने पोटात खड्डा पडला होता. पण उत्तराची भेट झाली आणि गप्पा रंगल्या. तालुका आणि आसपासच्या गावातल्या उद्योगव्यवस्था, वाढतं कोकण पर्यटन, कामगारांची उपलब्धता, आर्थिक गणिते असे कितीतरी विषय.

गेल्या गेल्या ऑर्डर दिल्यानंतर अक्षरशः १० मिनिटात थाळी वाढून तयार होती. मैत्रिणीने हाक दिली म्हणून गप्पा थांबवून पटकन जेवायला बसले. आधी डोळ्यांनी, मग नाकाने रसास्वाद घेतला आणि मग हातातोंडाची गाठ पडली. काकांना पोटभर थाळी संपणार नाही म्हणून त्यांनी अळवाचं फदफदं आणि गरम चपाती मागवली. आम्ही तिघांनी स्पेशल थाळी. भेंडीची भाजी, हरभरा उसळ, आमटी, गरम गरम पोळ्या, कोशिंबीर, सोलकढी, बटाटा भजी आणि उकडीचा लुसलुशीत मोदक ! आहा ! 'ब्रह्मानंदी टाळी लागली ! उत्तराने स्वतः केलेले हातवळणीचे मोदक आणि त्यावर लोणकढं तूप ! उपवास सोडायला यापेक्षा उत्तम मेनू काय मिळाला असता ? काका सुद्धा आळवाचं फदफदं आणि गरम पोळ्या खाऊन तृप्तीचा ढेकर देऊन बाहेर आले.

देवगडसारख्या तालुक्याच्या ठिकाणी प्युअर व्हेज हॉटेल नव्हतं, जी आहेत ती सगळी शाकाहारी, मांसाहारी दोन्ही पद्धतीची आहेत. जे लोक नॉनव्हेज खात नाहीत, ज्यांना नॉनव्हेज हॉटेलमध्ये जायचं नसतं, ज्यांना वास सुद्धा सहन होत नाही अशा अस्सल शाकाहारी खवय्यांनी कुठे जायचं हा प्रश्न आता उत्तरा जोशी यांच्या 'अथर्व प्युअर व्हेज'ने सोडवला आहे. गझलप्रेमी उत्तरा खूप साधी, सोज्वळ तर आहेच, पण अत्यंत हुशार आणि हरहुन्नरी देखील आहे हे तिच्याशी गप्पा मारताना कळलं. उच्च शिक्षणाबरोबरच घरचे व्यवसाय तिने समर्थपणे आपल्या इवल्याशा खांद्यावर घेतले आहेत. अनुभवानं आलेलं शहाणपण तिच्या वागण्या बोलण्यात दिसतंच. पण 'अतिथी देवो भव' हे तत्त्व ती जगते आणि आपुलकीने आपल्याला पुन्हा यायचं आमंत्रण सुद्धा देते. उत्तरा, आता गावी आले की 'अथर्व'ला एक भेट नक्की देणार !

**निवेदन :** आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणी यांच्याकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.

**नम्र सूचना :**

ज्या कुलबंधू, भगिनींना व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच एकाच नावाने एकाच पत्त्यावर अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.

| | |
|---|---|
| दिलीप भिडे, पुणे | ९६५७५४१२३६ |
| ले.क. सुनिल भिडे, पुणे | ९६२३०१७४४४ |
| प्रशांत भिडे, सातारा | ९४२३०३०५२७ |
| प्रदीप ज. भिडे, डोंबिवली | ९८९२५०४०४२ |

**निवेदन** – (१) श्री. प्रदीप व डॉ. शिला भिडे, दिल्ली तसेच कु. अश्विनी भिडे आणि श्री. रोहीत भिडे, ठाणे यांनी दिलेल्या शैक्षणीक निधीतून गरजु व गुणवंत आणि शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थीनींच्या शिक्षणासाठी विनापरतफेड आर्थिक मदत दरवर्षी दिली जाते. (२) भिडे कुलातील परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या गरजू, गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी विनापरतफेड आर्थिक मदत भिडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिली जाते. (३) भिडे परिवारातील व्यक्तींकडून आलेल्या शैक्षणिक देणगीमधून भिडे कुलातील गरजु, गुणवंत विद्यार्थी / विद्यार्थीनीकरीता शिक्षणासाठी विनापरतफेड आर्थिक मदत केली जाते. (४) भिडे परिवारातील व्यक्तींकडून आलेल्या वैद्यकीय निधीमधून भिडे कुलातील मंडळींना वैद्यकीय आर्थिक मदत विनापरतफेड केली जाते. अर्ज करण्यासाठी भिडे प्रतिष्ठानच्या bhidekul.in ह्या वेबसाइटवर शैक्षणिक आणि वैद्यकीय मदतीसाठी विहित नमुन्यातील अर्ज अपलब्ध आहेत. सदर अर्ज भरून आवश्यक माहिती भरून, कागदपत्रे जोडून पुणे कार्यालयाकडे पाठवावेत. अधिक माहितीकरीता भिडे प्रतिष्ठानचे सचिव दिलीप भिडे (९६५७५४१२३६) यांचेशी संपर्क साधावा.

# ज्योतिष : एका गूढ शास्त्राचा मागोवा

– सौ. स्नेहल विजय भिडे, ठाणे
ज्योतिष मार्गदर्शक आणि समुपदेशक

शीर्षकावरून साधारण सगळ्यांच्या लक्षात आलंच असेल, आपण कोणत्या गूढ शास्त्राबद्दल बोलणार आहोत. ज्योतिषशास्त्र विषय अवघड वाटला तरी समजून घेतला तर खूपच सोपा ! ज्योतिषाची व्याख्या खूप सरळ, साधी आणि सोपी आहे. असे शास्त्र जे ह्या जगात असलेल्या प्रत्येक निर्मितीचा भूत, भविष्य आणि वर्तमान ह्या तीनही काळांबद्दल ज्ञान आणि अज्ञात गोष्टींची माहिती आपल्याला देण्याचा प्रयत्न करते. वाचल्यावर आपल्याला असंच वाटत. हो ना ? पण ते खरच इतकं साधं, सरळ आणि सोपं आहे का ? इतर शास्त्रांमध्ये कसे सिद्धांत, नियम यांसारख्या गोष्टी असतात, तसे ह्या शास्त्राला पण आहेत. नियम आहे, सिद्धांत आहेत, गृहितकं आहेत. बरं, हे सगळं असेल तर ते कसे वापरले जातात आणि प्रत्येक गोष्टीला अपवादही असतातच. तसेच इथेही आहेत का ? ज्योतिषशास्त्र ही आपल्याला आपल्या पूर्वजांकडून मिळालेली एक सुंदर धरोहर आहे. त्याचा प्रचार आणि प्रसार कसा होईल आणि सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत ते कसे योग्य पद्धतीने पोचेल ह्याचा ही विचार करावा लागतोच. आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी, ह्याचा खूप छान अभ्यास आपल्यासाठी लिहून ठेवलेला आहे. ह्या शास्त्राला अध्यात्माचे अधिष्ठान आहे. ठोकताळे मांडताना, निरीक्षणे नोंदविताना ह्याचा खूप मोठा आधार प्रत्येक ज्योतिष अभ्यासकाला होत असतो. योग्य अभ्यास, योग्य शब्दात आपले निरीक्षण मांडण्याचा व अचूकपणे जास्तीत जास्त कसे नेटकेपणाने व वास्तवाशी जवळ जाऊन ही मांडता येईल हे ज्योतिष अभ्यासक म्हणून प्रत्येक अभ्यासकाचे ध्येय असावे लागते. ८० टक्के अचूक व वास्तवाजवळ जाणारे व २० टक्के दैव ज्याची त्याची कर्म, भोग, नियती, प्रारब्ध ह्यावर अवलंबून असते. ह्यामध्ये टक्केवारी थोडी कमी जास्त होणारी असते. पण ते अपवादात्मक स्थितीत. अर्थातच तिथे बरीच गणिते अवघड वाटू लागतात आणि अभ्यासाच्या दिशा तिथे थोड्या चुकण्याची शक्यता वाढत असते. आपल्याला नेहमीच ए + बी = सी असा विचार करायची सवय असते. ह्यात चूक काहीच नाही, पण जेव्हा ज्योतिषीय शक्यतांची गणित मांडणी येते, तिथे इतका मळलेल्या वाटेचा प्रवास करणे सोपे नसते. तरीही हे शास्त्र ज्यांना आवड आहे अशा शिकणाऱ्यांसाठी खूप विचार करायला लावणारे, मेंदूला छान खुराक देणारे आहे. आत्मिक समाधान देणारे निश्चितच आहे.

माझ्या समजुतीनुसार मला उलगडलेले हे शास्त्र मी आपणापुढे उलगडण्याचा अल्पसा प्रयत्न करणार आहे. माझे ह्या ज्योतिष अभ्यासातले गुरू आपल्या भिडे कुलातील श्री. अरुण भिडे, ठाणे हे आहेत. त्यांनी मला शिकवताना एक एक संकल्पना उदाहरणांसह समजावून सांगितल्या आहेत. अर्थात तेवढे मला जमेल की नाही माहीत नाही, पण माझा खारीचा वाटा आणि माझ्या गुरूंची शिकवण लक्षात ठेवून ही लेखमाला सुरू करत आहे. आपण लहानपणापासून सूर्य, चंद्र, तारे ह्यांना गोष्टी रूपातून भेटत आलो आहोत. हे सगळे तारे ज्योतिष्य शास्त्रात ज्यांना आपण ग्रह म्हणून संबोधतो, त्यांचा अभ्यास करणार आहोत. एक ज्योतिषी माहिती अभ्यास म्हणून ... आज आपण त्याची जुजबी माहिती घेऊ. मुळात असे किती ग्रह आहेत आपल्या अवकाश मंडळात ते पाहू. १) सूर्य (रवी), २) चंद्र, ३) मंगळ, ४) बुध, ५) गुरू, ६) शुक्र, ७) शनि, ८) राहू, ९) केतू, १०) हर्षल, ११) नेपच्यून, १२) प्लुटो. हे झाले आपल्या अवकाशात असणारे, काही साध्या नजरेने दिसणारे, तर काही दुर्बिणीतून. आता मी राहू आणि केतू ह्यांना इथे ग्रह म्हणून संबोधले आहे. पण ह्यातही दोन मत प्रवाह आहेत. एक, जो मी वरती उल्लेख केला आहे, आणि दुसरा म्हणजे राहू आणि केतू हे छेदन बिंदू आहेत. कारण ते आपल्या कुंडलीत नेहमी समोरासमोर दिसतात. (सध्या आपण ढोबळ माहिती घेत आहोत. त्यामुळे वर्ष कुंडलीतले त्यांचे स्थान असा इथे उल्लेख केलेला नाही.) पुढच्या भागात आपण एकेका ग्रहाची माहिती घेणार आहोत. तसेच त्या त्या ग्रहाचे कारकत्व, स्थानानुसार मिळणारे फल, युती योग इत्यादीची माहिती घेणार आहोत. ही सर्व माहिती फार खोलात न जाता दिलेली असेल. कारण शेवटी लिखाणाला मर्यादा असते. आपल्या सगळ्यांना पुढच्या भागाची उत्सुकता नक्कीच राहील !

# गोधडी...!

**सौ. संगीता भिडे, नाशिक**

'गोधडी' खूपच माझ्या प्रेमाची! नाही कोणीच तिच्या तोडीची !! कारण? आठवण देते ती माझ्या आजी-पणजी आणि आईची. या गोधडीची आठवण आहे अगदी माझ्या बालपणा-पासूनची, माझी आजी-पणजी आणि आईही नेसायची नऊवारी लुगडी, त्यामुळेच प्रेमाची ऊब देणारी असायची सदैव गोधडी. माझी आजी-पणजी आणि आजोबा असायचे जळगांवी स्वतःच्या घरी, अधूनमधून असायचे मुक्कामाला आमच्या घरी भुसावळ गावी. भुसावळ-जळगाव म्हणजे जणू अंगण-ओसरी, त्यामुळे सतत वाहायच्या आनंदलहरी! जळगावी गेलो की माझी निजायची जागा ठरलेली, आजीच्या कुशीत गोधडीच्या संगे. उन्हाळा असला तरी पायावर गोधडी आणि हातात घट्ट पकडून पदराचे टोक आजीचे. पणजीची तर मी खूपच लाडकी. म्हणायची मला, 'तू माझी सोनसाखळी' आणि हातावर असायची लिमलेटची गोळी! झोपायला तिच्याच लुगड्याची झोळी आणि पांघरायला तर तिच्याच लुगड्याची उबदार गोधडी ! कालावधी लोटला. पणजी आणि आजी कालवश झाल्या. त्यांच्या लुगड्याच्या शिवलेल्या गोधड्याही झाल्या जराजर्जर-जीर्ण. मग आठवली आईची लुगडी, तिच्या जुन्या लुगड्याचीही प्रत्येकाला गोधडी. तरीही आम्हा भावंडांची तिच्या रंगासाठी भांडाभांडी. मग आईपाशी त्यासाठी लाडीगोडी ! आईने मात्र सोडवायचा हा गुंता सहजासहजी.

आईचही झालं वय, थकूनभागून अंथरुणाला टेकली. मायेचा हात फिरवून मला म्हणाली, काय देऊ पोरी तुला? माझा एखादा दागिना की पैसा अडका ! अग आई, कशाला हवा दागदागिना नी पैसाअडका? आयुष्याला पुरेल एवढी दिली आम्हांला सुसंस्कारांची शिदोरी, प्रेमाची वाकळ, तेच तर माझ्यासाठी धन बक्कळ, द्यायचंच ना तर दे मला तुझी दोन चार जुनी लुगडी, शिवेन त्यांची छानशी गोधडी. होईल मला आणि तुझ्या नातवालाही तुझ्याच प्रेमाची छानशी गोधडी. हीच तर माझ्यासाठी भेट न्यारी !

आई, आता तूही गोधडी आमच्यासाठी ठेवून कायमची निघून गेलीस. तुला सांगू एक गंमत? आता तर तुझ्या पणतुलाही लागते पांघरायला तुझ्याच मायेची उबदार गोधडी, मला म्हणतो, 'मला हवी माझ्या पणजीचीच गोधडी! अग, हीच माझ्यासाठी केवढी सुखाची झोळी ! अगं, पुढल्या पिढ्यांना कशी ग कळावी, या गोधडीची गोडी ! कालगत झाली ग आतां नऊवारी लुगडी, पांघरले जरी 'दोहड' तरी ऊब नाही ग त्याला पारंपारिक प्रेमाची !

तूं दिलेली गोधडी झाली ग आतां जीर्ण, तरीही मला ती पुरवायची आहे माझ्याच जीर्ण आयुष्याच्या अंतापर्यन्त आणि यायचं आहे तिच्याच सोबतीनं तुझ्याकडे. अशी ही गोधडी काय सांगावी तिची कहाणी? डोळ्यात येते पाणी, जन्मोजन्मीची तीच तर असते सहचारिणी।

# भिडस्त भिडे

भक्ती करी सदा स्वामी समर्थांची
पण नाना कळा, श्रीकृष्णासम अंतरी
स्वभाव भोळा, सांब महादेवापरी
पण चित्ती सदैव, भ्रांती मम जीवनाची ।।
आदेश श्री स्वामी समर्थांचा
लाडका पण सर्व स्वामीभक्तांचा
शिष्यगण समुदाय, सभोवती त्यांच्या
सर्व जनांचा हा, भिडू अधिकाराचा ।।
धावूनी जाई, सर्वांच्या अडचणींना
पळवून लावी, सर्व मनोव्यथांना,
स्वतः स्विकारी, अनेकांचे दुःख
असे का या श्रांत जीवाला भोग ।।
ओढूनी घेई, बळेच सर्व व्याप्त
सतत मनाला, चिंता भक्तांच्या
आठवी सदैव त्यांच्या भक्तगणांना
मर्मावरी ठेवी सर्व गरजू व्यक्तींना ।।
क्रोध कधी तरी, अवचित भडके
मनहृदय परी, हळवे अनब मोकळे
कर्म करताना ना चुकवी कधी
गुरुभक्ती आठवा हा सेवेचा ठेवा ।।

**डॉ. चैताली भिडे**, नेरळ, मुंबई

# विवाह सुवर्णोत्सव

**ज्या भिडे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दाम्पत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दाम्पत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या जोडीदाराच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षांतील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित केले जातील.**

**अधिक माहितीसाठी संपर्क -**

**दिलीप भिडे, पुणे मो. ९६५७५४१२३६**

**ले. क. सुनिल भिडे (पुणे) मो. ९६२३०१७४४४**

**ई-मेल :** office@bhidekul.in

dilip.bhide15@gmail.com **येथे पाठवावेत.**

# कविता

## द्रष्टा

शुद्धीत मी अन् अशुद्धीत मी
सुखात मी अन् दुःखातही मी
प्रपंचात मी अन् परमार्थात मी
द्रष्टा होऊनि सारे बघतो मी
काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर
सत्त्व, रज, तम गुणांची त्यात भर
मन, बुद्धी हे घालती गोंधळ फार
द्रष्टा होऊनि सारे बघतो मी
बघता जसे चलचित्र पडद्यावर
चित्रविचित्र दृष्ये बसून खुर्चीवर
असे काल्पनिक जाणते अंतर
द्रष्टा होऊनि सारे बघतो मी

**– भावकांचन (कांचन भिडे, पुणे)**

## करायला बरंच आहे !

करायला बरंच आहे, पण बघ काय जमतं तुला,
वेळ तसाही जाणार आहे, काही नवीन करा.
आहेच बुद्धी, विचार आहे, ठरवून काही करा,
साधे साधे ते नेटाने, सातत्याने करा !
अगदी खूप त्या गप्पा मारा, वृद्धांशी जाऊन,
थोडे उन्हात ते उभे रहा, सकाळी उठून,
सहज साला तासभर, बघा उत्साह वाढतो,
सोबत कुणी आले तर घ्या, माणूस तो कळतो.
वेळ आहे, शिकून घ्या, गाणे अन् चित्रकला,
काही मुलांचा अभ्यास घ्या, तुमच्या करमणुकीला,
सहली काढा, बाहेर पडा, सुंदर मातृभूमी,
घ्या मातीचा सुवास, प्रेम द्या, ज्यांना मिळते कमी !

**– हेमंत भिडे, जळगांव**

## डॉक्टर डॉक्टर

एक दिवस डोकं माझं लागलं खूप दुखायला
घरगुती उपचार कमी पडले दवाखान्याकडे पाय वळले
सांगून होता सर्वकाही डॉक्टर जोरात हसले
भिडे, डोकं आहे हे काय कमी आहे ?
विनोद मला चांगलाच झोंबला
डॉक्टर होते ओळखीचे, कसातरी राग गिळला !
पुन्हा एकदा दवाखान्यात वेळ आली जायची,
बघताच मला डॉक्टर हसले, भिडे आता काय घडले ?
तुम्ही म्हणे डोक्यावर पडले ?
सूत्रांकडून बातमी आधीच कळली होती सारी
सुजला होता गुडघा, दुःख ही होते भारी
डॉक्टरांनी चिठ्ठी दिली, हाडवैद्याची घडली वारी
मग काय विचारता, एक्सरे एमआरआय, ब्लड टेस्ट
चाचण्यांची यादी तयार झाली
चक्रव्यूहात फसलेल्या अभिमन्यूची आठवण मला आली
प्रत्येक अवयवाचा वेगळा डॉक्टर
औषधांचाही असतो खुराक
सर्व जागेवर यायला वेळही लागतो बराच !
दिवसा मागून दिवस गेले, पैशा परी पैसा गेला,
कंटाळून हरतो माणूस म्हणतो,
यातनांपेक्षा पुढचा प्रवास बरा !
बहुतेक वृद्धांची हीच आहे परिस्थिती
बिन पैशांचे डॉक्टर डॉक्टर खेळलो होतो लहानपणी
या वयातील डॉक्टर डॉक्टर बँकेतील ठेव करते खाली
तरुणांनो सावध व्हा वेळीच, काळजी घ्या शरीराची
कारण हेल्थ इज वेल्थ, हेच खरे सत्य आहे !

**– विजय अनंत भिडे,** ठाणे

## मनाचे ध्यान

अनेक व्याधी आता, मनोकायिक आहेत,
मन अस्थिर आहे, हे समाईक आहे,
विशेष म्हणजे यावर, औषध तसे नाही,
विचार थांबवणे, हे कुणाच्या हातात नाही.
उपाय आहेत काही, आनंद शोधण्याचे,
काही अचाट असती, काही ना आवाक्याचे,
काही आसने करून, मन शांत होत नाही,
हट्टी अजून बनते, नवीन मागते ते काही
नुसते सैल बसावे, ही खरी मजा आहे,
काही न करायचे, बघ मन कुठे जात आहे,
लांबून फक्त बघणे, पाही कुठे ते जाते,
आश्चर्य होई बघता, हे आपुल्या मनात येते ?
कधीही चुप्प बसेना, मजला बसू देई ना,
कित्येक सुप्त इच्छा, अगणित मनोकामना,
शेवटी वाढे चिंता, मी खरे शरण जावे,
डोळे मिटून शांत, मी आंत डोकवावे.
साधेल हे तुम्हाला, सातत्य जरा ठेवा,
जे शांत हसत जगती, त्याचा करू न हेवा,
हळूहळू शांती येता, मग तुम्हाला कळेल,
सामर्थ्य बघ मनाचे, मग स्वर्ग तो उरेल !

**– हेमंत भिडे,** जळगांव

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

## Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Plot No. 7, 1st floor, Nagesh Banglow, Shahupuri Road,
Koteshwar Colony, Satara - 415002.
Email : psbexconsult@gmail.com

Reg.off. : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002.

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

**योग्य जोडीदार शोधताय?**

चित्पावन मित्र असोसिएशन, पुणे संचालित
**मराठी ब्राह्मण विवाह वेबसाईट**

**soyrikpune.com**



**नाव नोंदणी,स्थळे पहाणे सर्व ऑनलाईन**
**वार्षिक फी रु. १५०० फक्त**
विश्वनाथ भिडे 98508 20709
सुधीर उत्तुरकर 97309 55309

पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

सायंदैनिक प्राजक्त

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

**RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS**